

कॉलम ऑन
इन्शुरन्स
▪ रोहित शहा

# विम्यासंबंधी व्यावहारिक बाबींकडे लक्ष द्या

तुम्ही कोणत्याही स्वरूपाचा विमा उतरवण्याच्या विचारात असाल, तर विम्यासंबंधी काही मूलभूत नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. या वेळी अशाच मूलभूत नियमांविषयी माहिती घेऊया. आयुर्विमा, साधारण विमा आणि समुद्री विमा या सर्वांसाठी हे नियम समान रूपाने लागू होतात. मात्र, विमा नियामक इर्डाच्या नियमांच्या चौकटीत काम करताना यात काही प्रमाणात व्यावहारिक फरक पडू शकतो.

▪ **नुकसान भरपाई :** कोणत्याही स्वरूपातील नुकसानीची भरपाई व्हावी हा विम्याचा मुख्य उद्देश असतो. याचाच अर्थ विमा हा लाभासाठी उतरवला जात नाही. विम्याकडे जोखीम व्यवस्थापन आणि संभाव्य नुकसानीचा अंदाज देणारे एक साधन म्हणून पाहावे. उदाहरणार्थ विमाधारकाच्या मृत्यूनंतर त्याच्या कुटुंबाला मिळणारी नुकसान भरपाई आणि सुरक्षा अशा स्वरूपात त्याकडे पाहावे.

▪ **अंशदान :** एकाच प्रकारच्या जोखमीसाठी जेव्हा एखाद्याकडे दोन किंवा त्यापेक्षा जास्त विमा पॉलिसी असतील, तर हा नियम लागू होतो. एकाच प्रकारच्या नुकसानीसाठी अनेक विमा कंपन्यांकडून क्लेम घेता येत नाही, असे हा नियम सांगतो. विविध स्वरूपाच्या पॉलिसीअंतर्गत एकाच जोखमीची नुकसान भरपाई देणाऱ्या विमा कंपनीत नुकसान भरपाईची वाटणी करणे हा या मागचा उद्देश आहे.

▪ **विश्वास :** विमा हा दोन पक्षांतील करार असतो. म्हणजे विमा कंपनी आणि विमाधारक यांच्यातील हा करार असतो. विमाधारक आणि विमा कंपनी यांच्यात योग्य परस्पर संबंध आणि दृढ विश्वास असावा, असे हा नियम सांगतो. यानुसार विमाधारकाची सद्यःस्थितीबाबतची सर्व माहिती जाणून घेण्यासाठी विमा कंपनी त्या विमाधारकावरच अवलंबून असते. समजा तुम्ही आरोग्य विमा उतरवत असाल, तर सर्व प्रकारची माहिती विमा कंपनीला देणे तुमचे कर्तव्य आहे.

▪ **विमायोग्य पात्रता :** जेव्हा एखाद्या बाबीचा मालकी हक्क किंवा त्याचे आर्थिक अधिकार त्या व्यक्तीकडे असेल, तरच ती व्यक्ती विमा घेण्यासाठी पात्र असते, असे हा नियम सांगतो. उदाहरणार्थ, तुम्ही स्वतःसाठी तसेच तुमच्यावर अवलंबून असणाऱ्या कुटुंबातील सदस्यांचा विमा उतरवू शकता. मात्र, ताजमहालचा विमा तुम्हाला उतरवता येणार नाही.

▪ **सब्रगेशन :** विमाधारकाच्या क्लेमवर अधिकार सांगणाऱ्या पक्षाविरुद्ध कारवाई करण्याचा अधिकार या नियमामुळे विमा कंपनीला मिळतो. उदाहरणार्थ, क्ष व्यक्तीच्या चुकीमुळे विमाधारकाला अपघात झाला व त्याला रुग्णालयात दाखल व्हावे लागले, तर त्या क्ष व्यक्तीवर कारवाई करण्याचा अधिकार सब्रगेशनमुळे विमा कंपन्यांना मिळतो.

▪ **लॉस मिनिमायझेशन :** विमा संरक्षण असले तरी कमीत कमी नुकसान व्हावे यासाठी विमाधारकानेही सजग राहावे, असे हा नियम सांगतो. उदाहरणार्थ, विमाधारकाच्या घराला आग लागली, तर ती आग विझविण्यासाठी प्रयत्न करून कमीत कमी नुकसान होईल यासाठी विमाधारकाने प्रयत्न करायला हवेत.

▪ **तत्कालीन कारण :** जेव्हा अनेक कारणांमुळे नुकसान होते, तेव्हा विमा कंपनीला देणे मागण्यासाठी तत्कालीन कारण द्यावे, भूतकाळातील जुन्या बाबी उगाळत बसू नये, असे हा नियम सांगतो. ज्या वेळी अनेक कारणांमुळे नुकसान होते आणि ही सर्व कारणे विमा संरक्षणाच्या मर्यादेत येत असतील, त्या वेळी हा नियम लागू असतो.

**लेखक मान्यताप्राप्त गुंतवणूक मार्गदर्शक असून द फायनान्शियल प्लॅनर्स इंडियाचे सदस्य आहेत.**

rohit.shah@dainikbhaskargroup.com

**मेहेरनजर** | तिलैया प्रकल्पासाठी सरकारची मनमानी भूमिका

# रिलायन्स पॉवरवर सरकारची कृपा

बिझनेस ब्युरो | नवी दिल्ली

मागच्या वर्षी अनेक औद्योगिक प्रकल्पांबाबत मंजुरी, ढीगभर गैरव्यवहारांचे खुलासे करून थकल्यानंतरही सरकारकडून नियमभंग करण्याचा प्रकार सुरूच आहे. ताजे प्रकरण रिलायन्स पॉवरच्या तिलैया येथील प्रकल्पाशी संबंधित आहे. गुंतवणुकीसंबंधी नियुक्त करण्यात आलेल्या कॅबिनेट समितीने (सीसीआय) झारखंडस्थित या प्रकल्पाला मंजुरी देण्याबरोबरच रिलायन्स पॉवरला गैरमार्गाने एक खास सवलतही दिली आहे. त्यानुसार रिलायन्स पॉवरच्या (आर पॉवर) या प्रस्तावित प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या वन जमिनीच्या बदल्यात बिगर वन जमीन देण्याची सवलत देण्यात आली असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सध्याच्या नियमांनुसार एखाद्या कंपनीला जेवढी वन जमीन दिली जाते, त्याच्या नुकसान भरपाईसाठी त्या कंपनीला तेवढीच बिगर वन जमीन देण्यात येते व त्यावर वनीकरण करावे लागते. या वनीकरणाचा खर्च संबंधित कंपनीने करायचा असतो. या संदर्भात केवळ सार्वजनिक उद्योग (पीएसयू) आणि केंद्र सरकारच्या अंगीकृत उपक्रमांना सवलत आहे. मात्र, रिलायन्स पॉवरच्या प्रस्तावित तिलैया येथील ४००० मेगावॅटच्या प्रकल्पासाठी ही सवलत देण्यात आल्याची शक्यता आहे. सूत्रांनी सांगितले, आर पॉवरच्या तिलैया प्रकल्पाला सार्वजनिक उद्योगाच्या समतुल्य मानून ही सवलत मिळण्याची शक्यता आहे. याचाच अर्थ असा की, बिगर वन जमीन देण्याच्या अनिवार्यतेतून तिलैया प्रकल्पाला सूट देण्याचा सरकारचा घाट आहे. या सर्व बाबींवर लक्ष असणाऱ्या विश्लेषकांच्या मते, कोणत्याही खासगी मालकीच्या प्रकल्पासाठी अशा स्वरूपाची सवलत देणे निश्चितच गैर आहे. अल्ट्रा मेगाऊर्जा प्रकल्पसाठी मोठ्या प्रमाणात कोळसा लागतो. या प्रकल्पाची क्षमता किमान ४००० मेगावॅट असते आणि प्रकल्प उभारणीसाठी सुमारे २५,००० कोटींचा खर्चाचा अंदाज आहे.

### सरकारकडून नियमभंग

▪ कॅबिनेट समितीने झारखंडस्थित आर पॉवरच्या या प्रकल्पाला मंजुरी देण्याबरोबरच रिलायन्स पॉवरला गैरमार्गाने एक खास सवलतही दिली.

▪ बिगर वन जमीन देण्याच्या अनिवार्यतेतून तिलैया प्रकल्पाला केंद्र सरकारकडून सूट देण्यात आली.

▪ **नियम काय :** एखाद्या कंपनीला जेवढी वन जमीन दिली जाते, त्याच्या नुकसान भरपाईसाठी त्या कंपनीला तेवढीच बिगर वन जमीन देण्यात येते व त्यावर वनीकरण करावे लागते.

# डीएसपी ब्लॅकरॉकचा नवा डायनामिक फंड

प्रतिनिधी | मुंबई

मालमत्ता व्यवस्थापन क्षेत्रात कार्यरत असलेल्या डीएसपी ब्लॅकरॉक इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स प्रा.लि.ने डीएसपी ब्लॅकरॉक डायनामिक ॲसेट अलोकेशन फंड (डीएएएफ) बाजारात आणला आहे. या फंडाची विक्री १७ जानेवारीला सुरू झाली असून ती ३१ जानेवारीला बंद होईल.

अमर्याद मुदतीचा हा आगळावेगळा फंड मालमत्तेचे व्यवस्थापन करण्याकरिता डीएसपी ब्लॅकरॉक म्युच्युअल फंडाच्या विशिष्ट इक्विटी म्युच्युअल फंड योजना आणि कर्जविषयक म्युच्युअल फंड योजनांचा आधार घेऊन इक्विटी तसेच कर्जविषयक बाजारपेठेतील तुलनात्मक मूल्यांकनानुसार मालमत्तेचे गतिमान व्यवस्थापन करणार आहे. या योजनेचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे हा फंड गुंतवणूकदारांना त्यांच्या मालमत्तेची गुंतवणूक कशात करण्यात आली आहे याची माहिती पुरवतो. या योजनेअंतर्गत डीएसपी ब्लॅकरॉक म्युच्युअल फंडाच्या अतिशय यशस्वी कामगिरी करून दाखवणाऱ्या विशिष्ट योजनांमध्ये गुंतवणूक करणार आहे. या योजनेअंतर्गत समभाग आणि कर्जविषयक बाजारपेठेतील कामगिरी आणि चढ-उतारानुसार मालमत्तेचे वाटप करण्यावर भर दिला जाणार आहे. रोखासंग्रहाचे संतुलन आपोआप होत असल्याने चांगला परतावा मिळतो असा कंपनीचा दावा आहे.

**गुंतवणूकदारांना कळणार गुंतवणुकीची माहिती**






# कॉसमॉस बँकेची टॅब डोअरस्टेप योजना, मिळणार घरपोच सेवा

## बँकेचा वर्धापन दिन साजरा

प्रतिनिधी | पुणे

ग्राहकांशी थेट नाते जोडणाऱ्या सुविधांचे लाँचिंग करत कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक या मल्टिस्टेट शेड्युल्ड बँकेचा १०८ वा वर्धापन दिन शनिवारी येथे साजरा करण्यात आला. टॅब डोअरस्टेप बँकिंग, टोस्ट मास्टर्स क्लब तसेच बँकेची विभागीय कार्यालये व शाखांना जोडणारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा आदींचा या नव्या सुविधांमध्ये समावेश आहे.

बँकेचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. उपाध्यक्ष मिलिंद काळे, व्यवस्थापकीय संचालक विक्रांत पोंक्षे, ज्येष्ठ संचालक मुकुंद अभ्यंकर याप्रसंगी उपस्थित होते.

गोयल म्हणाले, टॅब डोअरस्टेप बँकिंगच्या माध्यमातून सधन ग्राहक, ज्येष्ठ नागरिकांना घरपोच सेवा दिली जाईल. बचत खाते सुरू करणे, पैसे काढणे वा भरणे, मुदत ठेव स्वीकारणे या सेवा दिल्या जातील. त्यासाठी बँकेतर्फे खास व्यापार प्रतिनिधी नेमले जातील. ग्रामीण भागातही ही सेवा दिली जाईल. टोस्ट मास्टर्स क्लबद्वारा सेवकवर्गाला विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल. बँकेची देशभरातील विभागीय कार्यालये व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून जोडली जाणार आहेत. बँकेचे सध्या ४५० महिला बचत गट कार्यरत असून साडेचार हजार महिलांना बँकिंग सुविधा दिली जात आहे.

# ग्रामीण, रिटेल क्षेत्र बळकटीवर भर

## युनायटेड इंडिया इन्शुरन्सचे एमडी मिलिंद खरात यांचे मत

समीर देशपांडे | कोल्हापूर

सध्या देशभरात साधारण विमा क्षेत्रामध्ये २८ कंपन्या कार्यरत आहेत. यामध्ये दुसऱ्या क्रमांकाची कंपनी म्हणून युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी ओळखली जाते. या अमृतमहोत्सवी कंपनीची २००० कार्यालये भारतात असून ९३७ मायक्रो ऑफिसेस उघडण्यात आली आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत कंपनीने ४७६८ कोटी रुपयांचा विमा व्यवसाय करून ३६५ कोटींचा निव्वळ नफा मिळवल्याचे युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मिलिंद खरात यांनी सांगितले.



सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यातील कलेढोण या खेड्यात जन्मलेल्या खरात यांनी गुणवत्तेच्या जोरावर युनायटेड इन्शुरन्सच्या प्रगतीचा झेंडा फडकवत ठेवला आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या खरात यांनी दैनिक 'दिव्य मराठी'शी खास चर्चा केली.

### १ दिवसात १०५०० दावे निकाली

खरात यांनी सांगितले की, देशभरातील जनरल इन्शुरन्सचे गेल्या वर्षी १० लाख दावे प्रलंबित होते. यामध्ये युनायटेड इंडिया इन्शुरन्सचे १ लाख ८० हजार दावे होते. २३ नोव्हेंबर २०११ रोजी कंपनीने घेतलेल्या महाअदालतीमध्ये दाखल केलेल्या १४ हजार दाव्यांपैकी ६६ टक्के म्हणजेच १०५०० दावे एका दिवसात निकाली काढले.

### विमा क्षेत्राला भारतात अजूनही वाव

अनेक देशांच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये जनरल इन्श्युरन्सचा वाटा ४ टक्क्यांपर्यंत गेल्याची उदाहरणे आहेत. मात्र, भारतात हेच प्रमाण ०.७ टक्के इतके आहे. अजूनही आपल्या देशात जनरल इन्श्युरन्सबाबत जनजागरणाची गरज आहे. त्यामुळेच ग्रामीण व रिटेल क्षेत्रात वाढीला मोठा वाव असल्याचे खरात यांनी सांगितले.

## न्यूज इनबॉक्स

### महिंद्रा अँड महिंद्राच्या प्रकल्पातील उत्पादन तीन दिवस बंद राहणार

**मुंबई** | उत्पादन आणि विक्री गरज यांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी महिंद्रा अँड महिंद्रा या कंपनीने आपल्या प्रकल्पांमधील वाहन उत्पादन या महिन्यात तीन दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. वाहन बाजारातील गरजा पूर्ण करण्यासाठी वाहनांचा पुरेशा प्रमाणात साठा उपलब्ध असल्याने या तीन दिवसांच्या बंदचा कोणताही विपरीत परिणाम होणार नाही, असे कंपनीने मुंबई शेअर बाजाराला दिलेल्या माहितीमध्ये म्हटले आहे. चढे व्याजदर आणि इंधनांच्या वाढलेल्या किमती यामुळे मंदावलेल्या अर्थव्यवस्थेत वाहन खरेदीवर खर्च करण्याची ग्राहकांची मानसिकता कमी झाली आहे. त्यामुळे वाहन उद्योगाला सलग दुसऱ्या वर्षी अडचणींचा सामना करावा लागत आहे.

### एलपीयूचा कॅनडा विद्यापीठाशी करार



**जालंधर** | कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ फ्रेजर व्हॅली (यूएफव्ही) आणि लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी (एलपीयू) यांच्यात शैक्षणिक करार झाला आहे. या करारावर एलपीयूचे कुलगुरू अशोक मित्तल आणि यूएफबीचे कुलगुरू के. आर. फिलिप्स यांनी स्वाक्षरी केली. मित्तल यांनी शनिवारी सांगितले, पहिल्या टप्प्यात एलपीयूच्या दोन विद्यार्थ्यांना यूएफव्हीमधील एक वर्षाचा अभ्यासक्रम साधारण भारतीय शुल्कात शिकता येणार आहे. यूएफव्ही हे कॅनडातील सरकारी विद्यापीठ आहे.

## भारत-दक्षिण कोरिया आर्थिक परिषद



दक्षिण कोरियाच्या अध्यक्ष एच. ई. पार्क गेयून-हे या सध्या भारताच्या दौऱ्यावर आहेत. असोचेमच्या वतीने नवी दिल्ली येथे भारत-कोरिया आर्थिक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्या वेळी खासदार व असोचेमचे माजी अध्यक्ष राजकुमार धूत आणि पार्क गेयून-हे. या वेळी भारत आणि कोरिया यांच्यातील व्यापारी संबंध वाढवण्यावर चर्चा झाली.

# पोलादाची मागणी 3 ते ५% वाढणार

## 'इंडिया रेटिंग्ज' संस्थेचा अहवाल

प्रतिनिधी | मुंबई

उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि तो भार ग्राहकांच्या खांद्यावर टाकण्यास पुरेसा वाव नसल्यामुळे पोलाद कंपन्यांच्या नफ्यावरील ताण कायम आहे; परंतु तरीही आर्थिक वाढ चांगली होण्याच्या अपेक्षेमुळे पुढील आर्थिक वर्षात देशातील पोलादाच्या मागणीत तीन ते चार टक्क्यांनी वाढ होण्याचा अंदाज 'इंडिया रेटिंग्ज'ने व्यक्त केला आहे.

पुढील आर्थिक वर्षात आर्थिक विकासदराचा आलेख चांगला राहून उद्योगवाढीलादेखील पुनरुज्जीवन मिळणार आहे. त्यामुळे पुढील आर्थिक वर्षात पोलादाच्या मागणीत वाढ होऊन ती तीन ते पाच टक्क्यांच्या दरम्यान राहील. पण ती पाच टक्क्यांपेक्षा जास्त नसेल असे 'इंडिया रेटिंग्ज'चे संचालक आशिष उपाध्याय यांनी सांगितले.

यंदाच्या आर्थिक वर्षातल्या एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत देशातील पोलादाचा वापर ०.५ टक्क्यांनी वाढून ५३.७८ दशलक्ष टनांवर गेला आहे. फीच समूहातील इंडिया रेटिंग्ज अँड रिसर्चने पुढील आर्थिक वर्षासाठी पोलाद क्षेत्रासाठी आपला नकारात्मक दृष्टिकोन कायम ठेवला आहे.

### किमती वाढणार नाहीत

देशातील पोलाद उद्योगातील क्षमतेचे प्रमाण जास्त असल्याने पुढील आर्थिक वर्षात पोलादाच्या किमतीत जास्त वाढ होणार नाही. परिणामी मागणी वाढली तरी किमती मर्यादेत राहतील. आयातीचाही फार मोठा धोका नसेल आणि ती मागील वर्षाच्या पातळीवरच राहील, अशी अपेक्षा उपाध्याय यांनी व्यक्त केली. देशातील पोलादाची सध्याची स्थापित क्षमता ९५ दशलक्ष टन असून पुढील आर्थिक वर्षात त्यात आणखी १३ ते १५ दशलक्ष टनांची भर पडण्याची अपेक्षा आहे.

# सेन्सेक्सची नव्या वर्षातील पहिली साप्ताहिक कमाई

प्रतिनिधी | मुंबई

महागाईतील घसरणीने दिलेला दिलासा आणि व्याजदर कमी होण्याची आशा यामुळे बाजारात आलेल्या खरेदीच्या उत्साहात सेन्सेक्सने नवीन वर्षात पहिल्यांदाच साप्ताहिक कमाई केली. त्यामुळे गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या घसरणीला लगाम बसून सेन्सेक्स ३०५ अंकांनी वाढून २१ हजारांच्या वरच्या पातळीवर बंद झाला.

व्याजदर कमी होण्याच्या आशेबरोबरच विदेशी निधीचा ओघही नव्याने बाजारात येऊ लागल्यामुळे गुंतवणूकदारांच्या उत्साहात आणखी भर पडली. विदेशी गुंतवणूकदार संस्थांनी या आठवड्यात १,५७७.९७ कोटी रुपयांची निव्वळ गुंतवणूक केल्याचे 'सेबी'ची आकडेवारी सांगते.

गेल्या आठवड्यात शुक्रवारी जाहीर झालेल्या अमेरिकेतील रोजगारविषक आकडेवारी अंदाजापेक्षा कमी असल्यामुळे जगभरातील सर्वच शेअर बाजारांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. फेडरल रिझर्व्ह बँक आपला महिन्याचा रोखे खरेदी कार्यक्रम आवरता घेण्यासाठी जास्त वेग देणार नाही, अशी अपेक्षाही आता गुंतवणूकदारांना वाटू लागली आहे. त्यातच महागाई डिसेंबरमध्ये ६.१६ टक्के अशा पाच महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आल्यामुळे बाजारात खरेदीचा उत्साह आणखी दुणावला. त्यामुळे भांडवली वस्तू, रिफायनरी आणि बँकांच्या समभागांना चांगली मागणी आली.

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक साप्ताहिक आधारावर भक्कम पातळीवर उघडून नंतर त्याने २१,३७९.२९ अंकांची कमाल पातळी गाठली. ९ डिसेंबर कामकाजाच्या मधल्या सत्रात सेन्सेक्सने कमाल पातळी गाठण्याची ही दुसरी वेळ आहे. नंतर ही पातळी काहीशी घसरली तरी दिवसअखेर सेन्सेक्स ३०५.१३ अंकांनी वाढून २१,०६३.६२ अंकांच्या पातळीवर बंद झाला. गेल्या दोन आठवड्यांत सेन्सेक्स ४३५.०९ अंकांनी घसरला होता.

### आठवड्याचे मानकरी

▪ **टॉप गेनर्स :** भेल, सिप्ला, एचडीएफसी, लार्सन अँड टुब्रो. रिलायन्स, एसएसएलटी, हीरो मोटोकॉर्प, हिंदुस्तान युनिलिव्हर, गेल इंडिया, बजाज ऑटो, ओएनजीसी, डॉ. रेड्डी लॅब, आयसीआयसीआय बँक.



▪ **टॉप लुझर्स :** कोल इंडिया, टीसीएस, सन फार्मा, टाटा पॉवर, टाटा स्टील, ॲक्सिस बँक.

## टी टाइम

मीनाक्षी कुलकर्णी
क्रमांक ८२४

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | | ■ | ६ | ७ |
| ८ | | | ■ | ९ | | ■ | १० | | |
| | ■ | ११ | १२ | | ■ | १३ | ■ | १४ | |
| १५ | १६ | ■ | | ■ | १७ | | १८ | | ■ |
| ■ | १९ | २० | | ■ | | ■ | | ■ | २१ |
| ■ | २२ | | ■ | २३ | | | | ■ | |
| २४ | ■ | २५ | | | | ■ | ■ | २६ | |
| २७ | | | ■ | | ■ | २८ | २९ | | ■ |
| | ■ | ■ | ३० | | ३१ | ■ | ३२ | | ■ |
| ३३ | | | ■ | ३४ | | | ■ | ३५ | |

**आडवे शब्द**
१. कन्याकुमारीपासून ते हिमालयापर्यंत
६. आच, दाह
८. एक अलंकार
९. मागील
१०. हर्ष, सुख
११. चटका, डाग
१४. सोन्याचांदीची तार
१५. तंबूची कनात
१७. भावाची पत्नी
१९. अवजड
२२. उटी
२३. दुर्गुण, खोड
२५. फरक, विसंगती
२६. मुलगा २७. उत्साह
२८. दोन दल असलेले धान्य
३०. औदुंबर
३२. जवळचा, सखखा
३३. नियंत्रण
३४. चांदी, रुपे
३५. कृपा, खुशी

**उभे शब्द**
१. काम न करणारा
२. एकसारखे (इं.)
३. तोडलेला भाग
४. डिमांड
५. वाईट सवय
६. अर्जुन
७. बंड, विद्रोह
१२. पक्ष्यांचा राजा
१३. दया, करुणा
१६. साठवलेले द्रव्य/धन
१७. एक पुराण
१८. इंधन, सरपण
२०. व्रताचे आचरण
२१. अंगावर ठिपके असलेला वाघ
२३. पोकळ देखावा
२४. ताकद
२६. बेताल, मोकाट
२९. हिंदीत दहा
३१. धूळ

क्रमांक ८२३ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| आ | म | ल | क | ■ | स | ■ | पॅ | ड | ■ |
| द | ल | ■ | लं | घ | न | ■ | गो | र | स |
| त | ■ | वा | द | ■ | ई | ■ | डा | का | ■ |
| ■ | क | स | र | ■ | ■ | भो | ■ | ळी | ■ |
| का | म | ना | ■ | भा | तु | क | ली | ■ | शिं |
| क | र | ■ | सि | ता | रा | ■ | ड | ब | के |
| ■ | ■ | बु | द्ध | ■ | ■ | क | र | वा | ■ |
| ■ | कु | ड | ता | ■ | तो | फ | ■ | ल | व |
| कै | ■ | बु | ■ | ■ | क | न | क | ■ | द |
| क | र | डा | ■ | गें | डा | ■ | क्षा | ल | न |

# नव्या स्मार्टफोनसाठी बीएसएनएलचा चॅम्पियन कंपनीशी करार

**अत्याधुनिक फोन** | स्मार्टफोनच्या अद्ययावत तंत्रासह वाजवी किमतीचे हँडसेट बनवण्यावर भर, द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरातील ग्राहकांवर नजर

प्रतिनिधी | मुंबई

महानगरांपलीकडच्या शहरांमध्येही स्मार्टफोनचा वाढता वापर लक्षात घेऊन सार्वजनिक क्षेत्रातील भारत संचार निगम लिमिटेडने चॅम्पियन या कंपनीशी सहकार्य करून पुढच्या पिढीतील अत्याधुनिक फोन बाजारात आणले आहेत.

बँकिंग तसेच इतर रोजची कामे मोबाइलवर झटपट होत असल्याने इंटरनेटवर आधारित उपाययोजनांचा वापर खूप होत आहे. बीएसएनएलने चॅम्पियन कॉम्प्युटर्ससोबत काही साधनांच्या विक्रीसाठी करार केला असून त्यांनी टॅब्लेटसाठी एक खास ३जी डाटा प्लॅन जाहीर केला आहे. त्यात मासिक ५०० एमबी मोफत डाटा आणि ५० मिनिटे ऑन-नेट व्हॉइस कॉल्स सहा महिन्यांसाठी दिले जाणार असल्याचे बीएसएनएलचे संचालक अनुपम श्रीवास्तव यांनी सांगितले.

द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरातील ग्राहक टेक्नोसॅव्ही बनत आहेत. त्यामुळे अशा प्रकारच्या उत्पादनांसाठी या बाजारपेठेत चांगली मागणी असल्याचे चॅम्पियन कॉम्प्युटर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक कपिल वाधवा यांनी सांगितले.

### बीएसएनएल चॅम्पियन माय फोन एसएम ३५१२

▪ अँड्रॉइड व्ही. ४.२.२ (जेली बीन)
▪ ड्युएल कोअर प्रोसेसर
▪ ड्युएल सिम (जीएसएम आणि जीएसएम)
▪ वारंवारिता जीएसएम ९००/१८०० मेगाहर्ट्झ
▪ ३.५ इंच स्क्रीन (८.९ सें.मी.)
▪ ३२ जीबीपर्यंत विस्तारित होणारी मेमरी
▪ ड्युएल कॅमेरा (फ्रंट १.३ एमपी, मागील ३ एमपी)
▪ टॉकटाइम ६ तासांपर्यंत
▪ स्टँडबाय कालावधी ३५० तास
▪ एफएम आणि एफएम रेकॉर्डिंग
▪ वायफाय, जी सेन्सर
▪ बॅटरी ली आयन (१३०० एमएएच)

किंमत : ३,२२५ रुपये



### बीएसएनएल चॅम्पियन माय एसएम ३५१३-३ जी

▪ अँड्रॉइड व्ही. ४.२.२ (जेली बीन)
▪ ड्युएल कोअर प्रोसेसर
▪ ड्युएल सिम (जीएसएम, जीएसएम)
▪ ३जी जीएसएम ९००/१८०० मेगाहर्ट्झ, डब्ल्यूसीडीएमए २१००
▪ ८.९ सेंमीची (३.५ इंची) टच स्क्रीन
▪ ३२ जीबीपर्यंत वाढवली जाऊ शकणारी मेमरी
▪ ड्युएल कॅमेरा (फ्रंट १.३ एमपी, मागील ३ एमपी)
▪ सहा तासांपर्यंत टॉकटाइम
▪ स्टँडबाय टाइम ३५० तास
▪ एफएम आणि एफएम रेकॉर्डिंग
▪ वायफाय, जी सेन्सर
▪ बॅटरी ली आयन (१३०० एमएएच)

किंमत : ४,४९९ रुपये